# नि.दि.मु.क्र. २९२/२००० मधील नि.३४६ वरील आदेश

( मधुकर बाचल वि. मनोहर बाचल व. )

१. प्रस्तुत अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठी व दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ९४ सी प्रमाणे दाखल केला आहे

२. अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :—

दावा मिळकत परिशिष्ट अ अ.क्र.१ मधील दोन एकर शेतजमिनीची नांगरट प्रतिवादी नं.१ब यांनी दि. १३/०९/२०१६ रोजी केली आहे. त्यामुळे रे.दि.मु.नं. ४९२/१९९७ मधील नि.५८ वरील दि. ०३/१०/१९९८ च्या मनाई हुकूमाचा भंग केला आहे. प्रस्तुत दावा वाटपाचा असून पुराव्याअभावी प्रलंबित आहे. प्रतिवादी जाणुनबुजून दावा मिळकतीचा वापर करत आहेत व न्यायालयीन आदेशाचा अवमान करत असल्यामुळे त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यासाठी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी नं.१अ ते १ड तर्फे या अर्जाला म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारली आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, वादी, प्रतिवादी नं.२ व ३ यांच्याकडे शेती असून ते शेतीतून उत्पन्न घेत आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज बेकायदेशिर आहे. प्रतिवादी नं.१ब ने कोणत्याही न्यायालयीन हुकूमाचा अवमान अथवा भंग केला नाही. त्यासाठी स्वतंत्र अर्ज वादीने दाखल करणे आवश्यक आहे. केवळ न्यायालयाचे मत कलुषित करण्यासाठी वादीने हा अर्ज दाखल केला असून त्याच्यासोबत प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही. तसेच कोणत्या हुकूमाचा अवमान केला याचा उल्लेख अर्जात केला नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज चालू शकत नसल्यामुळे तो नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी नं.१अ ते १ड तर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रे पाहिली. खालील मुददे माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्याचे निष्कर्ष मी त्या समोर खालील कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी केस शाबित केली आहे काय? | नाही |
| २ | न्यायाचा झुकता तराजु वादीच्या बाजुने आहे काय ? | नाही |
| ३ | अर्ज नामंजुर केल्यास वादीला अपरिमित हानी होईल काय? | नाही |
| ४ | आदेश काय ? | अर्ज नामंजुर. |

## <u>**कारणमीमांसा**</u>

५. वादी, प्रतिवादींतर्फे या अर्जाच्या अनुषंगाने कोणतेही दस्तऐवज दाखल केले नाहीत.

६. <u>**मुद्दा क. १ ते ३ साठी :—**</u>

वादीच्या म्हणण्याप्रमाणे, रे.दि.मु.नं. ४९२/१९९७ मधील नि.५८ वरील दि. ०३/१०/१९९८ च्या मनाई हुकूमाचा प्रतिवादी नं.१ब ने भंग केला आहे. या दाव्याचा जुना स्पे.दि.मु.नं. ४७२/१९९७ आहे. वादीतर्फे याकामी रे. दि.मु.नं. ४९२/१९९७ चा व या दाव्याचा कोणता संबंध आहे याचा उल्लेख केला नाही. रे.दि.मु.नं. ४९२/१९९७ मधील नि.५८ वरील आदेशाची प्रत याकामी दाखल केली नाही. प्रस्तुतचा आदेश यामधील प्रतिवादी नं.१ब विरुध्द देण्यात आला होता असे दाखवण्यासाठी त्याची प्रत दाखल केली नाही. रे.दि. मु.नं. ४९२/१९९७ मधील आदेशाचा भंग केला असल्यास वादीने त्या प्रकरणामध्ये प्रतिवादी नं.१ब विरुध्द कारवाई करणे अपेक्षित आहे. परंतु, वादीने याकामी हा अर्ज कोणत्याही कारणास्तव दाखल केला आहे. रे.दि.मु.नं.

४९२/१९९७ मधील आदेश या न्यायालयावर कशा प्रकारे बंधनकारक आहे याचा उल्लेख केला नाही. तसेच सदर न्यायालयीन आदेशाचा प्रतिवादी नं.१ब ने भंग केला असल्यास त्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम २अ अन्वये वादी वैयक्तिक कामकाज करु शकतो. त्या करिता या दाव्यामध्ये अर्ज देण्याची आवश्यकता नाही.

७. वादीने या अर्जासोबत शपथपत्र दाखल केले नाही. त्यामुळे अर्जातील कथनांना पुष्टी मिळत नाही. वादीच्याच म्हणण्याप्रमाणे, प्रस्तुत दावा वाटपाचा असल्याने प्रतिवादी नं.१ब ने दावा मिळकतीमधील २ एकर जमिनीची नांगरट केल्यास वादीला कोणती हानी होणार आहे हे स्पष्ट झाले नाही. तसेच या अनुषंगाने वादीतर्फे कोणताही दस्तऐवज दाखल केला नाही. त्यामुळे प्रतिवादी नं.१ब यांनी न्यायालयीन आदेशाचा भंग केला हे सिध्द होत नसल्याने त्याच्याविरुध्द कोणतीही कारवाई करता येणार नाही. त्यामुळे वादीने त्याची प्रथमदर्शनी केस शाबित न केल्याने न्यायाचा झुकता तराजू वादीच्या बाजूने नाही. हा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी नं.१ब ला जास्त हानी होण्याची शक्यता आहे. याउलट अर्ज नामंजूर केल्यास वादीला कोणतेही नुकसान होणार नाही. वादीने अशाच प्रकारचे अर्ज देवून प्रकरण लांबवल्याचे यापूर्वी देखिल निदर्शनास आले आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून खालील आदेश पारित करते :—

## आदेश

१. अर्ज नामंजूर.

२. अर्जाचा खर्च मूळ न्यायनिर्णयावर अवलंबून राहिल.

कोरेगांव {श्र.म. हिंगसे}
दिनांक ०९/१२/२०१६ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कोरेगांव